जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/3८98/२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :-१८/०३/२०२४

**विषय :- महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३६ प्रमाणे आदेश.**

**आदेश**

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र.४३७/६/१/ECI/PN/23/2024 DATE 16.03.2024 अन्वये १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहीता दिनांक १६/०३/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. बारामती लोकसभा मतदार संघात मतदान दिनांक ०७/०५/२०२४ तसेच पुणे व शिरुर लोकसभा मतदार संघात दिनांक १३/०५/२०२४ रोजी रोजी होणार असून, मतमोजणी ही दिनांक ०४/०६/२०२४ रोजी होणार आहे.

त्याअर्थी, सदरच्या निवडणूका ह्या सुरळीतपणे व शांततेत पार पाडणे साठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून मी **प्रविण पवार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर** मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३६ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१) कोणत्याही कारणासाठी सार्वजनिक सभा / सभेचे ठिकाण व वेळ याबाबत संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

२) कोणत्याही प्रकारच्या मिरवणूका काढण्याबाबत संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

३) ध्वनीक्षेपकाचा वापर कोणत्याही प्रकारे रात्रौ २२.०० ते सकाळी ०६.०० वा. पर्यंत करु नये.

४) फिरत्या वाहनावरुन ध्वनीक्षेपकाचा वापर करु नये. ध्वनीक्षेपकाचा वापर वाहन थांबवूनच करावा.

५) ध्वनीक्षेपकाचा परवाना जवळ बाळगावा.

६) ध्वनीक्षेपकाच्या आवाजाच्या तिव्रतेवर घालून दिलेल्या मर्यादेची काटेकोरपणे पालन करावे.

७) शाळा, कॉलेज, रुग्णालय या ठिकाणी थांबून ध्वनीक्षेपकाचा वापर करु नये.

८) निवडणूकीचे कालावधीत प्रचाराच्या अनुषंगाने एकावेळी कोणत्याही परिस्थितीत १० पेक्षा अधिक वाहने एका ताफ्यात चालवू नयेत. तसेच दोन ताफ्यातील अंतर हे २०० मीटर/ १५ मिनीटांचे असावे.

९) सदरचा आदेश संरक्षण वाहनांच्या ताफ्यासह, केंद्र किंवा राज्य शासनाचे मंत्री किंवा उच्च पदस्थ व्यक्ती घेवून जात असेल तेव्हा त्यांच्या सुरक्षितते विषयी लागू असलेल्या आदेशास अधिन राहून अंमलात राहील तसेच सदरचा आदेश शासकिय कामावर असलेल्या वाहनाच्या संदर्भात लागू राहणार नाही.

Scanned with OKEN Scanner

१०) रस्त्यावरुन जाणाऱ्या जमावाचे अगर मिरवणुकीत व्यक्तीचे वागणे अगर कृत्याबाबत पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने आदेश देणे.

११) ज्या मार्गाने मिरवणूक किंवा जमाव जाईल अगर जाणार नाही ती वेळ व मार्ग पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने निश्चित करणे.

१२) सार्वजनिक ठिकाणी अगर सार्वजनिक करमणुकीच्या कार्यक्रमाच्या वेळी वापरण्यात येणाऱ्या लाऊड स्पिकरच्या ध्वनीची तिव्रता निश्चित करून दिलेली वेळ यावर पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने नियंत्रण करणे.

१४) मिरवणुकीचे प्रचाराच्या निमित्ताने जाहीर सभा घेण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ याबाबत पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने नियंत्रण करणे.

हा आदेश संपूर्ण पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत दिनांक १८/०३/२०२४ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक ०६/०६/२०२४ चे २४.०० वा. पर्यंत लागू राहील. सदरचा आदेश भंग करणारी व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १३४ नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक १८/०३/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- १८/०३/२०२४

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

(प्रविण पवार)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

Scanned with OKEN Scanner